Literacy for a Billion

Movie: Not Only Mrs. Raut
Year: 2003

Song: Ase Shant Hone Mala Pelvena
Lyricist: Gajendra Ahire

असे शांत होणे मला पेलवेना
सुखाची अनोळखी चाहुल लागे
असे शांत होने मला पेलवेना
सुखाची अनोळखी चाहुल लागे
असे मोकळे हे श्वास होतात तेव्हा
उबेचा शहारा अलवार मागे
हे माझेच आणि मला का कळेना
असू दे असू दे जरी वेगळेसे
सावलीत माझ्या कवडसे माझे
रूपेरी रूपेरी कधी सावलीसे
सावलीत माझ्या...
ऋतूंना कसे सांगू बहरू नका रे
मला पानझड ही आता सोसवेना
ऋतूंना कसे सांगू बहरू नका रे
मला पानझड ही आता सोसवेना
नव्याने फुलावे हवे वाटते पण
नको तो फुलांचा कहर सोसवेना
उजळून येती क्षणांचे निखारे
टपोरे टपोरे कधी वाहले से
सावलीत माझ्या...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*